
ePaper
पाकिस्तानच्या कुरघोड्या सुरुच, पंजाबच्या निवासी भागावर ड्रोनने हल्ला
| वर्ष - 8 | अंक - 277 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शनिवार, दि. 10 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- यशस्वी जैस्वालचा यू- टर्न!
- आम्ही सदैव तुमचे ऋणी राहू
- त्यांचं मनोधैर्य खच्ची करता कामा नये
- सीमेवर तणाव, पण शेअर बाजार स्थिर


### पाकचे पळपुटे पंतप्रधान, लष्करप्रमुख, अनेक मंत्री देशातून गायब

# देशाचे चार तुकडे होण्याची पाकला भीती!


## भारतावर एका रात्रीत पाचशे ड्रोन हल्ले : सर्व अयशस्वी !

## कुरव्यात दाऊद, छोटा शकीलचा चक्क पाकिस्तानातून पोबारा !

| नवी दिल्ली / इस्लामाबाद / श्रीनगर |
प्रतिनिधी | महाईन्यूज

**भारताकडून होत असलेल्या लष्करी कारवाईचा पाकिस्तानच्या नेत्यांनी एवढा धसका घेतला आहे, की राजकीय नेते पाकिस्तानातून गायब होण्यास सुरुवात झाली आहे. कुख्यात दहशतवाद्यांनी एक तर आपल्या बंकरमध्ये किंवा ज्या ठिकाणी भारताला पत्ता लागणार नाही अशा ठिकाणी लपून बसण्यास प्राधान्य दिले आहे. कुख्यात डॉन दाऊद इब्राहिम आणि छोटा शकील यांनी तर परदेशात पलायन करून अज्ञात स्थळ गाठले आहे. पळपुटे राजकीय नेते मात्र कॅनडाच्या आश्रयाला गेले असल्याचे वृत्त आहे.**



### अचूक हल्ले, पाकड्यांना धडकी...

भारताकडून मोजकेच पण अचूक हल्ले होत असल्याचे निष्पन्न झाले असून पाकिस्तानचे पळपुटे पंतप्रधान शहाबाज शरीफ, लष्करप्रमुख आणि अनेक मंत्री कॅनडाच्या आश्रयाला गेले आहेत. त्याचप्रमाणे, कुख्यात दाऊद इब्राहिम, छोटा शकील यांनीही देशातून पोवारा केला आहे. हाफिज सईद सारख्या दहशतवाद्यांनी पाकिस्तानातच आपापल्या सुरक्षित जागा बळकावल्या आहेत.

### पाकड्यांचे पाचशे ड्रोन हल्ले..

भारतीय लष्कराच्या नियोजनबद्ध, शिस्तबद्ध अचूक कारवाईमुळे वैतागलेल्या पाकिस्तानच्या लष्कराने बुधवारी रात्री भारतीय सीमेलगतच्या गावांवर आणि शहरांवर सुमारे ५०० ड्रोन हल्ले केल्याचे वृत्त आहे. सीमेवर सजग आणि अलर्ट असलेल्या भारतीय लष्कराच्या जवानांनी हे सर्व हल्ले निष्फळ ठरवले आणि पाकड्यांना चांगलीच चपराक दिली आहे.

### कराचीतून दाऊद गायब

मोस्ट वॉन्टेड अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम पळून गेला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून तो पाकिस्तानातील कराची येथे आश्रयास होता. 'ऑपरेशन सिंदूर' मुळे पाकिस्तानचे कंबरडे मोडले असून दहशतवाद्यांना देत असलेला पाठिंबा त्यांनी काढला आहे. अशा परिस्थितीत, भारताकडे दाऊद इब्राहिमला आणि त्याच्यासोबत असणाऱ्या दहशतवाद्यांना पकडण्याची मोठी संधी आहे, हे तेथील दहशतवादी देखील जाणून आहेत.

### मुंबई बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपी..

१९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील दाऊद इब्राहिम हा मुख्य आरोपी आहे. तो भारतातील अनेक दहशतवादी हल्ल्यांमध्येही सहभागी होता. सुरुवातीच्या काळात तो दुबईत राहत होता, पण नंतर तो त्याच्या कुटुंबासह पाकिस्तानात आला आणि तेव्हापासून कराचीतच लपून बसला.

### तर एक गठ्ठा तीन हजार दहशतवादी ठार झाले असते !

भारताच्या कारवाईच्या पहिल्या दिवशी अवघ्या काही मिनिटांचा उशीर झाला, अन्यथा मदरशातच एक गठ्ठा ३००० दहशतवादी ठार झाले असते. मुरिदके प्रांताला लष्कर-ए-तोयबा का गढ मानला जातो.१९८० च्या दशकात हाफिज सईद याने येथे एक मदरसा बनवला होता. येथेच लष्करच्या दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जाते आणि काश्मीर खोऱ्यात सोडले जाते. 'अल-जजीरा' च्या वृत्तानुसार या मुरिदकेच्या मदरशात जर काही मिनिटांच्या आधी भारताचा एअर स्ट्राईक झाला असता, तर एकाच वेळी लष्करचे ३००० दहशतवादी एकाच जागीच ठार झाले असते.

### दाऊद कोणत्या देशांमध्ये लपू शकतो?

दुबई आणि पाकिस्तान व्यतिरिक्त दाऊद आणि त्याचा साथीदार छोटा शकील लंडन, ब्राझील, फिलीपिन्स, हाँगकाँग आणि जर्मनीसारख्या सुरक्षित देशांमध्ये लपू शकतात. गुन्हेगारांसाठी सर्वात सुरक्षित ठिकाण लंडन आणि ब्रिटनमधील आहेत. लंडनमधील पोलिस आणि न्यायव्यवस्था विश्वासार्ह मानली जाते. अशा परिस्थितीत, हे गुन्हेगार अशा देशांचा शोध घेतात, जिथे त्यांच्या अटकेचा धोका जवळजवळ नसतो. त्यांच्या व्यवस्थांमध्ये कायदेशीर गुंतागुंत आहे ज्यामुळे गुन्हेगार सुरक्षित राहतात.

# तिसऱ्या भाषेबाबत अभ्यास सुरू!

## हिंदी सक्ती मागे घेतल्यानंतर सुधारित शासन निर्णयाची प्रतीक्षा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात पहिलीपासून हिंदी सक्तीवरून माघार घेतल्यानंतर शिक्षण विभागाने अद्याप सुधारित शासन निर्णय अद्याप प्रसिद्ध केलेला नाही. या संदर्भात, 'अन्य भारतीय भाषा उपलब्ध करून देण्याबाबत, तसेच त्यासाठी द्याव्या लागणाऱ्या सुविधांबाबत अभ्यास करण्यात येत आहे,' असे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी स्पष्ट केले आहे.**



राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने पायाभूत आणि शालेय स्तरासाठीचा राज्य अभ्यासक्रम आराखडा तयार केला. त्यात पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी हा विषय अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, या निर्णयाला राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातून तीव्र विरोध झाल्यानंतर शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी 'अनिवार्य' शब्दाला स्थगिती देत असल्याचे जाहीर करून सुधारित निर्णय प्रसिद्ध करण्याची घोषणा २२ एप्रिल रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत केली होती.

त्यानंतर अद्याप सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध झालेला नाही.नवे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास महिनाभराचाच कालावधी असल्याने तिसरी भाषा पहिलीपासून लागू होणार का, हिंदी व्यतिरिक्त अन्य भारतीय भाषांचे पर्याय उपलब्ध करून दिले जाणार का, की तिसऱ्या भाषेचा निर्णय स्थगित केला जाणार याबाबत अजूनही स्पष्टता आलेली नाही.'नव्या शैक्षणिक वर्षात हिंदीची पाठ्यपुस्तके तयार आहेत, म्हणून हिंदीपासून सुरुवात करण्यात येऊ नये. तिसरी भाषा लागू केली जाणार असल्यास सर्व भारतीय भाषा एकाच वेळी उपलब्ध कराव्यात. तोपर्यंत सध्याच्याच पद्धतीने शैक्षणिक कामकाज कायम ठेवले पाहिजे. या बाबत शिक्षण विभागाने पारदर्शकपणे स्पष्टता देण्याची आवश्यकता आहे. तसेच लवकर निर्णय घेऊन तो जाहीर करण्याचीही गरज आहे,' असे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे यांनी व्यक्त केले.'मुळात पहिलीपासून हिंदीच नाही, तर कोणत्याही तिसऱ्या भाषेची आवश्यकता नाही. त्यामुळे तिसऱ्या भाषेचा निर्णय राज्य सरकारने स्थगित केला पाहिजे,' अशी भूमिका मराठी अभ्यास केंद्राचे डॉ. दीपक पवार यांनी मांडली.नव्या शैक्षणिक वर्षात पहिलीच्या विद्यार्थ्यांवर हिंदीची सक्ती केली जाणार नाही. तसेच, अन्य भारतीय भाषा उपलब्ध करून देण्यासंदर्भात, तसेच त्यासाठी द्याव्या लागणाऱ्या सुविधांबाबत अभ्यास करण्यात येत आहे.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने पायाभूत आणि शालेय स्तरासाठीचा राज्य अभ्यासक्रम आराखडा तयार केला. त्यात पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी हा विषय अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

### तिसरी भाषा पहिलीपासून लागू होणार

मात्र, या निर्णयाला राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातून तीव्र विरोध झाल्यानंतर शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी 'अनिवार्य' शब्दाला स्थगिती देत असल्याचे जाहीर करून सुधारित निर्णय प्रसिद्ध करण्याची घोषणा २२ एप्रिल रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत केली होती. त्यानंतर अद्याप सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध झालेला नाही.नवे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास महिनाभराचाच कालावधी असल्याने तिसरी भाषा पहिलीपासून लागू होणार का, हिंदी व्यतिरिक्त अन्य भारतीय भाषांचे पर्याय उपलब्ध करून दिले जाणार का, की तिसऱ्या भाषेचा निर्णय स्थगित केला जाणार याबाबत अजूनही स्पष्टता आलेली नाही.'नव्या शैक्षणिक वर्षात हिंदीची पाठ्यपुस्तके तयार आहेत.

# तक्रारीची वाट न पाहता धोकादायक झाडे काढ

## महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांचे उद्यान विभागाला आदेश

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील धोकादायक झालेली झाडे तसेच फांद्या काढून टाकण्याचे आदेश महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी गुरुवारी दिले. नागरिकांकडून तक्रार करण्यात येईल, त्यानंतर धोकादायक फांद्या काढू, यावर अवलंबून न राहता स्वत: पाहणी करून पावसाळा सुरू होण्याआधी ही कामे पूर्ण करा, अशा सूचना पृथ्वीराज यांनी उद्यान विभागाला दिल्या आहेत.**



पावसाळापूर्व कामांना शहरात सुरुवात करण्यात आली आहे. नाले, पावसाळी गटारे, ड्रेनेज, चेंबर्स साफ करण्याची कामे सुरू झाली आहेत. ही कामे करताना अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या पडलेल्या आढळल्या. काही भागांत धोकादायक झाडे आणि फांद्या असल्याचे समोर आले आहे. यापैकी काही झाडे ही सोसायट्यांच्या आवारात असून, त्याच्या फांद्या बाहेर आलेल्या आहेत. या फांद्या धोकादायक झाल्याने पदपथावरून चालणाऱ्या नागरिकांसाठी त्या धोकादायक ठरत आहेत.रस्त्यावरील धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी महापालिकेच्या उद्यान विभागाकडून केली जात आहे. मात्र, खासगी सोसायटीच्या आवारात असलेल्या आणि ज्यांच्या फांद्या रस्त्यावर आलेल्या आहेत, त्यांची छाटणी करायची झाल्यास सोसायटीने अर्ज केला तरच या फांद्या तोडू, अशी भूमिका उद्यान विभागातील कर्मचारी घेत आहेत. त्यामुळे अपघात घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सोसायटीने तक्रार दिल्यानंतरही उद्यान विभागाचे कर्मचारी अद्याप त्याला मान्यता मिळालेली नाही, असे सांगत धोकादायक ठरणाऱ्या फांद्या काढत नसल्याच्या तक्रारी महापालिका प्रशासनाकडे आल्या आहेत. त्यामुळे तक्रारींची किंवा सोसायटीच्या अर्जांची वाट न पाहता रस्त्यावर असलेल्या झाडांच्या फांद्या तातडीने काढण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी केल्या आहेत. धोकादायक झाडे तसेच फांद्या काढण्याच्या कामासाठी उद्यान विभागाकडे ४७ वाहने असून, त्या माध्यमातून ही कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पावसाळापूर्व कामांना शहरात सुरुवात करण्यात आली आहे. नाले, पावसाळी गटारे, ड्रेनेज, चेंबर्स साफ करण्याची कामे सुरू झाली आहेत. ही कामे करताना अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या पडलेल्या आढळल्या. काही भागांत धोकादायक झाडे आणि फांद्या असल्याचे समोर आले आहे. यापैकी काही झाडे ही सोसायट्यांच्या आवारात असून, त्याच्या फांद्या बाहेर आलेल्या आहेत. या फांद्या धोकादायक झाल्याने पदपथावरून चालणाऱ्या नागरिकांसाठी त्या धोकादायक ठरत आहेत.रस्त्यावरील धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी महापालिकेच्या उद्यान विभागाकडून केली जात आहे.

### अपघात घडल्यास जबाबदार कोण?

मात्र, खासगी सोसायटीच्या आवारात असलेल्या आणि ज्यांच्या फांद्या रस्त्यावर आलेल्या आहेत, अशी भूमिका उद्यान विभागातील कर्मचारी घेत आहेत. त्यामुळे अपघात घडल्यास त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सोसायटीने तक्रार दिल्यानंतरही उद्यान विभागाचे कर्मचारी अद्याप त्याला मान्यता मिळालेली नाही.

### भाजपा आमदार महेश लांडगे यांची महत्त्वपूर्ण बैठक

# अखेर चिखली, चऱ्होलीची 'टीपी स्कीम' रद्द होणार!

## महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचा सकारात्मक प्रतिसाद

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मौजे चिखली आणि चऱ्होलीत महानगरपालिका प्रशासनाची प्रस्तावित TP SCHEM अखेर रद्द होणार आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे भूमिपुत्र आणि ग्रामस्थांना दिलासा मिळणार आहे.**



चिखली, चऱ्होली येथील प्रस्तावित 'टीपी स्कीम' बाबत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक केली. सुमारे तीन तास सुरू असलेल्या बैठकीमध्ये लांडगे यांनी ग्रामस्थ, भूमिपुत्रांची भूमिका ठामपणे मांडली.

पिंपरी-चिंचवड शहराच्या स्थापनेपासून 3 ते 4 वेळा आमच्या भूमिपुत्रांच्या जमिनींचे शासनाच्या वतीने भूसंपादन करण्यात आले आहे. 1970 च्या दरम्यान औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगधंद्यांसाठी भूसंपादन केले, हा पहिला अन्याय झाला. त्यानंतर पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची स्थापना करुन आमचा विरोध असतानाही जमिनी ताब्यात घेतल्या. टाटा मोटर्स कंपनीच्या विस्तारासाठी पुन्हा आमच्या जमिनींवर भूसंपादनाची कारवाई केली. त्यावेळीही आम्ही आंदोलन उभा केले होते. 1997 मध्ये ग्रामस्थांचा विरोध असताना गावांचा समावेश महापालिका हद्दीत करण्यात आला. प्रत्येकवेळी भूमिपुत्रांवर अन्याय झाला आहे. त्यामुळे या भागात टीपी स्कीम लागू नये, अशी आग्रही भूमिका आमदार लांडगे यांनी आयुक्तांसमोर मांडली.

> मौजे चिखली आणि चऱ्होलीत महानगरपालिका प्रशासनाने लादलेली TP Schem रद्द करण्याबाबत आम्ही संघर्षाची तयारी ठेवलेली आहे. आज झालेल्या बैठकीमध्ये आयुक्त शेखर सिंह यांनी सकारात्मक प्रतिसाद देत टीपी स्कीम रद्द होण्याबाबत 'ग्रीन सिग्नल' दिलेला आहे. लवकरच याबाबत प्रशासन 'नोटिफिकेशन' काढेल असा विश्वास आहे. भूमिपुत्रांवर कोणताही अन्याय होऊ देणार नाही मी कायम त्यांच्या सोबत आहे.
> -**महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड, पुणे.

प्रस्तावित टीपी स्कीमबाबत चिखली आणि चऱ्होली या दोन्ही गावातील ग्रामस्थांमध्ये प्रचंड असंतोष होता. आमदार महेश लांडगे यांनीही सातत्याने टीपी स्कीमला विरोध केलेला आहे. त्यामुळे 'टीपी स्कीम' बाबत काय निर्णय होतो? याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले होते. दरम्यान महापालिका आयुक्त रजेवर होते. आज आयुक्त महापालिकेत रुजू झाल्यानंतर तात्काळ बैठक घेण्यात आली. त्यामुळे आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला यश मिळताना दिसत आहे.

---

## युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर उद्योगनगरीत हायअलर्ट!

### महत्वाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली; वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसंह कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांना 'ऑपरेशन सिंदूर'चा तडाखा दिल्यानंतर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी - चिंचवड पोलीसांनीही शहरात हायअलर्ट जारी केला आहे. महत्वाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढ करण्यात आली आहे. तसेच, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसंह कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द करण्यात आल्या आहेत..**







पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालयाचा भाग लष्करी दृष्टिकोनातून विशेष महत्त्वाचा भाग मानला जातो. दापोडी येथे लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा (सीएमई) परिसर आहे. दिघी येथे संशोधन व विकास संस्था (आर अँण्ड डीई) आहे. देहुरोड येथे अॅम्युनिशन डेपो आहे. तर, तळेगाव दाभाडे येथे एनडीआरएफचे कार्यालय आहे. त्यामुळेहा परिसर लष्करासाठी अत्यंत महत्वाचा आणि संवेदनशील आहे. सध्या देशभरात युद्धजन्य वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी - चिंचवड पोलीसांनी पोलिसांनी खबरदारी घेण्याच्या सूचना जारी केल्या आहेत. महत्वाच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढ करण्यात आली आहे.

### 'व्हिजीबल पोलीसिंग'वर भर

शहरात शांतता अबाधित राखण्यासाठी व कायदा - सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता व्हिजीबल पोलीसिंग राबवले जात आहे. सुरक्षेच्या दृष्टीने गर्दीच्या ठिकाणी भेटी देवून सुचना दिल्या जात आहेत. नागरिकांशी संवाद साधला जात आहे. पोलीस आयुक्तालयातील जास्तीत जास्त वरिष्ठ पोलीस अधिकारी व अमंलदार हे सुरक्षेच्या दृष्टीने गर्दीची ठिकाणे असणारे मॉल, व्यापारी संकुल, बाजार पेठ, उद्याने, पर्यटन स्थळे, रेल्वे बस स्थानक या सारख्या महत्वाच्या ठिकाणी भेटी देवून सुरक्षिततेच्या दृष्टीने तपासणी योग्य पद्धतीने करण्याबाबत सुचना दिल्या जात आहेत. पोलिसांची विविध पथके तयार करुन त्याद्वारे गोपनीय माहिती संकलीत केली जात आहे. चुकीच्या अथवा सोशल मिडीयावर अफवा पसरविणाऱ्या संदेशांवर पोलीस बारकाईने नजर ठेवून आहेत.

> "पोलीस आयुक्तालय हद्दीतील महत्वाची ठिकाणे तसेच, संवेदनशील आस्थापना या ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. व्हिजीबल पोलीसिंग राबवले जात आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये."
> **- संदीप डोईफोडे** (पोलीस उपायुक्त)

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### शुद्ध वातावरण व पवित्र आचरण

आपल्या घरातले वातावरण शुद्ध, शांत आणि पवित्र असावे. आपल्याकडे येणाऱ्या माणसाला परत जाऊच नये असे वाटावे. अगदी भगवंताच्या इच्छेने प्रपंच चालला आहे असे समजून, त्या प्रपंचात विद्या, वैभव, घरदार इ. सर्व काही यश संपादन करा; अगदी एखाद्या राजयोग्याप्रमाणे प्रपंचात ऐषआरामात राहून गाद्यागिरद्यांवर लोळा; पण हे करीत असताना तुमचे अंत:करण मात्र भगवंताच्या प्रेमाने ओथंबलेले राहू द्या. कोणाशी वाद घालीत बसू नका. जगाचा मान फार घातक आहे; त्याची चटक लागली की मनुष्य त्याच्यामागे लागतो, नंतर मान मिळविण्याची कृती थांबते आणि मानही नाहीसा होतो. जगातले अजिंक्य पुरुषसुद्धा कुठेतरी विषयात गुंतलेले असतात, तिथे त्यांचा घात होतो. जगाला ते भारी असतील, पण त्या विषयापुढे त्यांचे काहीच चालत नाही. प्रेमात गुंतू नका, तसे द्वेषमत्सरातही गुंतू नका; दोन्ही सारखेच घातक आहेत. आपला प्रिय नातेवाईक मेला, आणि आपण ज्याच्यावर दावा लावला आहे तो भाऊबंद मेला; दोघेही मेल्याचे सुतक सारखेच ! त्याचप्रमाणे, मनुष्य प्रेमाने गुंतला काय आणि द्वेषाने गुंतला काय, नुकसान सारखेच होते.

भगवंताचा विसर हा कोणत्याही कारणाने झाला तरी बरा नाही; मग प्रपंचात सुखसोयी असल्याने तो होवो किंवा प्रपंचात दु:ख झाल्यामुळे होवो. ढोंग, बुवाबाजी इ. च्या भानगडीत तुम्ही पडू नका; अगदी काहीही न केलेत तरी चालेल, पण ढोंग मुळीच करू नका; आणि सर्वांनी माझ्यावर कृपा करा, अगदी अनुभवाने मी सांगतो, की बुवा होण्याच्या फंदात तुम्ही पडू नका. आपले कर्तव्य भगवंताच्या स्मरणात करून, त्याचे अनुसंधान अखंड टिकू द्या. आमची अशी वृत्ती बनण्यासाठी संतांच्या संगतीची आपल्याला जरुरी आहे. आपण सर्वजण सत्संगतीमध्ये आहोत असे म्हणतो, मग आमची वृत्ती का न सुधारावी ? तर संतांना ज्याची आवड आहे ते आम्ही धरले नाही, म्हणून आमची वृत्ती सुधारत नाही. श्रीकृष्णाने उद्धवाला ज्ञान देऊन त्याला गोपींकडे पाठविले. भगवंताच्या नामामध्ये त्या रंगून गेल्या होत्या. गोपींचे नामावरचे प्रेम पाहून उद्धवाला आश्चर्य वाटले. नामामध्ये त्यांना भगवंत दिसत असे; ते पाहून उद्धवाने देवाला सांगितले, "देवा, तू मला ज्ञान दिलेस खरे, पण तुझ्या भक्तीचे प्रेम त्याहून श्रेष्ठ आहे, ते तू मला दे." खरोखर, त्या नामाचे माहात्म्य देवाच्या वर्णनापेक्षाही कठीण आहे. तुम्ही सर्वजण इथे आला आहात; इथून रामाजवळून काही मागून न्यायचेच असेल तर त्या नामाचे प्रेम तुम्ही सर्वांनी मागा. सर्वांनी नामस्मरण करा आणि आनंदात राहा. राम कृपा करील, हा भरवसा बाळगा.

बोधवचन:- आपल्या जीवनात सहजता हवी. सहजतेमध्ये समाधान आहे.



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# स्वतंत्र बलुचिस्तानचे 'स्वप्न साकार', पाकच्या भूमीचा घटणार आकार !

**पाकिस्तानच्या जुलमी जोखडातून स्वतंत्र होण्याचे स्वप्न उराशी बाळगून वर्षानुवर्षे लढा देणाऱ्या बलुचिस्तानचे स्वप्न अखेर साकारण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्वातंत्र्यापासून हा प्रदेश कधीच पाकिस्तानशी एकनिष्ठ राहिला नाही आणि गेली सुमारे ७५ वर्षे तो पाकिस्तानच्या हुकूमशाही राजवटीची झुंजत राहिला आहे.**



### बलुचिस्तानची आशा नरेंद्र मोदी..

भारतामध्ये २०१४ साली भारतीय जनता पार्टीचे नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आल्यापासून बलुचिस्तानची स्वतंत्र राष्ट्र होण्याची आशा पल्लवीत झाली होती आणि त्यांचे सर्व लक्ष भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केंद्रित झाले होते. भारतात नरेंद्र मोदी यांना ज्या ज्या वेळी यश मिळत होते, त्या त्यावेळी बलुचिस्तानमध्ये मिरवणुका निघत आणि 'मोदी मोदी' नाऱ्याचा जयघोष होत असे. आता मोदी सरकारकडून ज्यावेळी पाकिस्तानच्या दहशतवादी अड्डयांवर कारवाई करण्यात आली, त्यावेळी त्यांच्या आशा अशाच पल्लवीत झाल्या !

### पाक सैनिक हे तर मोठे शत्रू..

बलुचिस्तानवर ताबा राखण्यासाठी आणि तेथील जनतेला नियंत्रणात ठेवण्यासाठी जे सैनिक पाकिस्तानकडून पाठवले जात असत, ते तर या बलोची नागरिकांचे सर्वात मोठे शत्रू ! पाकिस्तानी सैन्याची नुकतीच त्यांनी एक रेल्वे उडवून दिली, त्यात शेकडो सैनिक मारले गेले आणि आता भारताकडून कारवाई होत असल्याचे समजतात त्यांच्या स्वयंघोषित संघटनांनी उचल खाल्ली आणि बघता बघता आपला प्रांत स्वतंत्र केल्याची घोषणा केली..स्वतंत्र बलुचिस्तानला अजून आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता नसली तरी हे काम नरेंद्र मोदी करणार याची त्यांना खात्री आहे !

### स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा..

बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी लढा देणाऱ्या संघटनांनी एकत्र येऊन संपूर्ण परिसराचा ताबा घेतल्याची घोषणा तसेच स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणाही करून टाकली आहे. आमच्या देशाचा दिल्लीत लवकरच दूतावास असेल आणि त्याबाबत संयुक्त राष्ट्राकडे प्रस्ताव पाठवला आहे, असे त्यांनी आपल्या घोषणेत म्हटले आहे. पाकिस्तानला हा आणखी एक दणका असून पाकिस्तान चांगलाच कोंडीत सापडला आहे.

### चौक्यांवर हल्ले आणि ताबा..

एकीकडे भारतीय लष्कराने पाकला चोख प्रत्युत्तर दिले आहे तर दुसरीकडे 'बलुच लिबरेशन आर्मी' ने पाकिस्तानी सैन्याच्या चौक्यांवर मोठा हल्ला चढवला आहे, ताबा घेतला आहे आणि त्यांच्या नेत्यांनी बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची घोषणा केली आहे, हा पाकिस्तानला मोठा हादराच आहे. आता, पाकिस्तानची युद्धाची खुमखुमी चांगलीच जिरणार आहे. पाकिस्तानचे दोन तुकडे होण्याची दाट शक्यता आहे. भारतीय लष्कराने पाकिस्तानवर चढाई केल्यानंतर आता बलुच लिबरेशन आर्मीला सुद्धा सत्तर हत्तींचे बळ आले आहे. बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी सैन्याच्या चौक्या ताब्यात घेतल्या आहेत. यामुळे पाकिस्तानचे कंबरडे मोडणार, हे सांगायला ज्योतिषाची गरज नाही.

### मीर यार बलोच यांची घोषणा..

भारत आणि पाक यांच्यात हल्ले-प्रतिहल्ले सुरू असतानाच बलुच लेखक मीर यार बलोच यांनी स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा केली आहे. सोशल मीडिया एक्सपोर्ट 'एक्स' वर त्यांनी लांबलचक पोस्ट लिहिली आहे. त्यांनी बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची घोषणा केली आहे, संयुक्त राष्ट्राकडे शांती पथक पाठवण्याची विनंती करत बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याला मान्यता देण्याचा प्रस्ताव दिला आहे. बलुच लिबरेशन आर्मीने बलुचिस्तानमधील अनेक शहर आणि परिसरावर कधीचाच ताबा मिळवला आहे. या भागातील शाळा, महाविद्यालये, सरकारी आस्थापनातील पाकिस्तानी झेंडे फेकून देण्यात आले आहेत, तर दुसरीकडे येथे पाकिस्तानी राष्ट्रगीताला बंदी घालण्यात आली आहे. त्यांचा कारभार एखाद्या स्वतंत्र राष्ट्रासारखा सुरू झाला आहे.

### स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता द्या..

संयुक्त राष्ट्र संघाने बलुचिस्तान स्वातंत्र्याविषयीचा प्रस्ताव मंजूर करावा. बलुचिस्तानला स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता द्यावी, संयुक्त राष्ट्राने सर्व सदस्य देशांची एक बैठक बोलावावी आणि बलुचिस्तानाला मान्यता द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे. तर बलुचिस्तानचे नवीन चलन आणि पासपोर्टसाठी सहकार्य करण्याची विनंती सुद्धा करण्यात आली आहे. स्वतंत्र व्यवसाय त्यांनी सुरू केला आहेच. पण, स्वतःच्या स्वतंत्र चलनाबाबतही मोठी झेप घेतली आहे.

### दिल्लीत दूतावास उघडणार..

या संपूर्ण लढ्याचे नेते मीर यार बलोच यांनी दहशतवादी पाकिस्तानचे पतन आता जवळ आल्याचे म्हटले आहे. पाकिस्तानची फाळणी निश्चित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यांनी बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची घोषणा केली आहे. दिल्लीत बलुचिस्तानचा दूतावास आणि अधिकृत कार्यालय सुरु करण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती त्यांनी भारत सरकारकडे केली आहे. त्यावर काय निर्णय घ्यायचा याबाबत भारताच्या नेत्यांमध्ये लवकरच चर्चा सुरू होईल.

### पाक लष्कराने भूभाग सोडावा..

पाकिस्तानी सैन्याने बलुचिस्तानच्या सर्वच क्षेत्रातून माघार घ्यावी. हा भूभाग सोडावा, हवाई, समुद्र आणि जमिनीवरील सर्व हालचाली थांबवाव्यात. बलुचिस्तानमधून काढता पाय घ्यावा, तसेच संयुक्त राष्ट्र संघाने त्यांचे प्रतिनिधी मंडळ पाठवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. बलुचिस्तानच्या नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी लवकरच घेण्यात येईल, असे मीर यार यांनी स्पष्ट केले आहे. या मंत्रिमंडळात महिलांचे प्रतिनिधित्व लक्षणीय असेल याची त्यांनी हमी दिली आहे. मित्र राष्ट्रांच्या प्रमुखांना या स्वातंत्र्य सोहळ्यासाठी आमंत्रण पाठवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### पाकला मोठा धडा असेल !

दहशतवाद्यांची फॅक्टरी असणाऱ्या पाकिस्तानला स्वतःच्या ताकदीबद्दल प्रचंड अहंगंड आहे. त्यांची जिरवायची असेल तर भारताने आता पाकव्याप्त काश्मीर मोकळा करावा, बलुचिस्तान स्वतंत्र करावा आणि सिंध प्रांतामध्ये लढा सुरु असल्याने तो भूभागही पाकिस्तानपासून तोडावा.. म्हणजे पाकिस्तानचे एवढे तुकडे झाल्यानंतर त्यांची मस्ती जिरेल आणि दहशतवाद्यांची फॅक्टरी बंद पडेल, अशी मागणी संपूर्ण जगातून होत आहे. त्याला भारत आता कसा प्रतिसाद देणार, हे पाहणे मात्र महत्त्वाचे आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रील वॉर रुम!

## फडणवीस यांनी सुरक्षेचा आढावा घेतल्यानंतरचे दिले निर्देश

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.**

मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते.प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा. ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा. ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागरण करा. केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या. प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा. प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची




### बाहेरून लाईट दिसणार नाही

पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा. ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागरण करा. केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या. प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा.

खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो 1 तासात मंजूर करा. एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही 'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या. पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिंग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा. सैन्याच्या तयारी संबधित गतिविधीचे चित्रिकरण करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा आहे, त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा.सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आवश्यकतेनुसार फिशिंग ट्रॉलर्स भाड्याने घ्या नागरिकांना परिस्थितीबाबत अद्ययावत व खरी माहिती पोहोचवणे यासाठी शासनाकडून व्यवस्था उभी करा. शासनाच्या अतिमहत्वाच्या पायाभूत सुविधा (उदा. विद्युतनिर्मिती, वितरण) यावर सायबर हल्ले होण्याची शक्यता लक्षात घेता सायबर विभागाकडून त्वरित सायबर ऑडिट करून घ्या सरकार आणि सुरक्षा यंत्रणा यात अधिक समन्वयासाठी मुंबईतील सैन्याचे तिन्ही दल तसेच कोस्टगार्डच्या प्रमुखांना पुढील बैठकीत व्हीसी माध्यमातून निमंत्रित करा.मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते.प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा. ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात.

# नालेसफाईच्या कामात यंदाही घोटाळा!

## उपनगर पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांचा आरोप

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुंबई महापालिका प्रशासनाने कितीही खबरदारी घेतली तरी नालेसफाईच्या कामात यंदाही घोटाळा झाल्याचे उघडकीस आले आहे. नालेसफाईच्या गाळाचे 'एआय' तंत्रज्ञानाने केलेल्या विश्लेषणात तब्बल ४० टक्के प्रकरणात फेरफार झाल्याचे उघड झाल्याची धक्कादायक माहिती शुक्रवारी उपनगरचे पालकमंत्री ॲड आशिष शेलार यांनी नालेसफाई पाहणी दौऱ्यात उघड झाली.**

पालिका आयुक्तांनी तातडीने नालेसफाईच्या नोंदीचे विश्लेषण करावे आणि कंत्राटदाराकडून १०० टक्के अपेक्षित काम



करून घ्यावे, असे निर्देश शेलार यांनी दिले.पावसाळ्यात मुंबईत पूरस्थिती निर्माण होऊ नये म्हणून मुंबईत दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाई केली जाते.

नालेसफाईच्या कामात कंत्राटदारांना कोणतीही चलाखी करता येऊ नये म्हणून यंदा मुंबई महापालिकेने एआय या तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. मात्र तरीही नालेसफाईचा गाळ काढून वाहून नेण्यात कंत्राटदारांनी चलाखी केल्याचे उघड झाले आहे.

मुंबई उपनगरात सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामांची ॲड. आशिष शेलार यांनी गुरुवारपासून पाहणी करण्यास सुरुवात केली आहे. घाटकोपर बस डेपो शेजारी असलेल्या लक्ष्मी नगर नाल्यापासून शुक्रवारी सकाळी पाहणी दौऱ्याला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी ए.पी. आय नाला, उषा नगर नाला, माहुल नाला, माहुल खाडी परिसर आणि खारु खाडी येथील कामाची पाहणी केली.या वेळी आमदार मिहिर कोटेचा, मुंबई महापालिकेतील माजी गटनेते भालचंद्र शिरसाट, प्रभाकर शिंदे, मुंबई महापालिकेतील विरोधी पक्षनेते रवी राजा, भाजपाचे पदाधिकारी विनायक कामत,

### कंत्राटदाराकडून 100 टक्के अपेक्षित

तेव्हा यंदा एआयच्या गाळ मोजणी व देखरेखीच्या कामांना सुरुवात झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या बाबतीत अधिक माहिती घेतल्यानंतर प्रत्येक वाहनातून वाहून नेलेला गाळ टाकण्यात येतो त्याची चित्रफित तयार करण्यात येते. त्याला एआयच्या माध्यमातून स्कॅन केले जाते.नालेसफाईचा गाळ वाहून नेण्यासाठी ४० हजारांहून अधिक फेऱ्या झाल्या असून त्यातील १७ हजार गाड्यांच्या फेऱ्यांमध्ये फेरफार सापडला आहे. गाळाचे प्रमाण प्रत्यक्षापेक्षा जास्त दाखवणे, गाळ कमी दाखवणे, गाळामध्ये राडारोडा भरणे अशा प्रकारचे हे फेरफार आहेत. गाळ अजूनही नाल्यातच असून फेरफार करून कंत्राटदार चलाखी करीत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे फेरफार आणि कंत्राटदारांची देयकांचे विश्लेषण करा आणि कंत्राटदाराकडून १०० टक्के अपेक्षित काम करून घ्या, असे निर्देश शेलार यांनी यावेळी पालिका प्रशासनाला दिले.

माजी नगरसेविका रितू तावडे, संबंधित विभागाचे अधिकारी आणि स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते. मुंबईतील नालेसफाईमध्ये उपसण्यात येणाऱ्या गाळाचे मापन हे तंत्रज्ञानाच्या मदतीने व्हावे अशी मागणी गेली अनेक वर्षे आशिष शेलार करीत होते.. शुक्रवारच्या पाहणीच्या वेळी त्यांनी याबाबत अधिकाऱ्यांना विचारणा केली.

# त्यांचे मनोधैर्य खच्ची करता कामा नये!

## लष्करी अधिकाऱ्यांच्या मुद्द्यावरून न्यायालयाने केंद्राला सुनावलं!

**।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारतीय हवाई दलानं पाकव्याप्त काश्मीर व पाकिस्तानच्या हद्दीत केलेल्या एअर स्ट्राईकनंतर दोन्ही देशांमधील संबंध कमालीच ताणले गेले आहेत. भारतानं एअर स्ट्राईक केल्यानंतर त्यासंदर्भात पत्रकार परिषदेत माहिती देणाऱ्या कर्नल सोफिया कुरेशी सध्या चर्चेत आहेत. आजदेखील परराष्ट्र मंत्रालयाच्या पत्रकार परिषदेत सोफिया कुरेशी यांनी विंग कमांडर व्योमिका सिंह यांच्यासमवेत ८ आणि ९ मे च्या मध्यरात्री भारतीय लष्करानं केलेल्या कारवाईची माहिती दिली. आज सर्वोच्च न्यायालयात एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान कर्नल सोफिया कुरेशी यांचाही संदर्भ देण्यात आला.**



शॉर्ट सर्व्हिस कमिशन तत्वावर रुजू झालेल्या लष्करातील महिला अधिकाऱ्यांच्या संदर्भातील एका प्रकरणाची सुनावणी आज सर्वोच्च न्यायालयात पार पडली. एकूण ६९ महिला लष्करी अधिकाऱ्यांनी गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका सादर केली होती. न्यायमूर्ती सूर्य कांत व न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठासमोर या याचिकांवर एकत्रित सुनावणी पार पडली. कर्नल गीता शर्मा यांच्यावतीने ज्येष्ठ वकील मनेका गुरुस्वामी यांनी बाजू मांडली, तर एएसजी ऐश्वर्या भाटी यांनी केंद्र सराकरकडून युक्तिवाद केला.शॉर्ट सर्व्हिस कमिशन तत्वावर रुजू केलेल्या महिला लष्करी अधिकाऱ्यांना पदमुक्त केलं जाऊ नये, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. मात्र, केंद्र सरकारकडून ऐश्वर्या भाटी यांनी या महिला लष्करी अधिकाऱ्यांना पदमुक्त करण्याच्या बाजूने युक्तिवाद केला. त्यावरून सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला सुनावलं आहे."सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीत आपण त्यांचं मनोधैर्य खच्ची करता कामा नये. त्या सर्व महिला अतिशय हुशार अधिकारी आहेत. तुम्ही त्यांच्या सेवेचा इतर जबाबदाऱ्यांसाठीही वापर करू शकता. या अशा काळात त्यांना न्यायालयात खेटे घालण्यास सांगितलं जाऊ शकत नाही. त्या महिला अधिकारी एका चांगल्या ठिकाणी असायला हव्यात आणि त्यांनी देशाची सेवा करायला हवी", असं न्यायमूर्ती कांत यांनी नमूद केलं. यावेळी न्यायालयाने "पुढील सुनावणी होईपर्यंत सध्या सेवेत असणाऱ्या कोणत्याही लष्करी अधिकारी महिलेला सेवामुक्त केलं जाऊ नये", असे आदेश दिले.दरम्यान, केंद्र सरकारची बाजू मांडणाऱ्या ऐश्वर्या भाटी यांनी लष्कराच्या व्यवस्थेचा दाखला दिला. "भारतीय लष्करामध्ये एखाद्या पिरॅमिडप्रमाणे व्यवस्था आहे. आपल्याला अधिकाधिक तरुण अधिकारी लष्करात हवे आहेत", असं त्यांनी म्हणताच न्यायमूर्ती कांत यांनी हा मुदा फेटाळून लावला. "भारतीय लष्करात अनुभवी आणि नवोदित अशा दोन्ही अधिकाऱ्यांचा समतोल असायला हवा. तरुण अधिकाऱ्यांनाही प्रशिक्षणाची, मार्गदर्शनाची गरज असते. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मानसिक स्थैर्य आवश्यक असतं", असं ते म्हणाले.६० हजार फुटांवर आपले लष्करी अधिकारी कोणत्याही गोष्टीची तमा न बाळगता उभे असतात. तेव्हा प्रत्येकाला त्यांचा अभिमान वाटतो. आपण सगळे त्यांच्यासमोर फार लहान वाटतो. हे अधिकारी आपल्या सगळ्यांसाठी काय काय करतात", असंही न्यायमूर्ती कांत म्हणाले.शॉर्ट सर्व्हिस कमिशन तत्वावर रुजू झालेल्या लष्करातील महिला अधिकाऱ्यांच्या संदर्भातील एका प्रकरणाची सुनावणी आज सर्वोच्च न्यायालयात पार पडली. एकूण ६९ महिला लष्करी अधिकाऱ्यांनी गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका सादर केली होती.

### अधिकाऱ्यांना पदमुक्त केलं जाऊ नये

न्यायमूर्ती सूर्य कांत व न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या खंडपीठासमोर या याचिकांवर एकत्रित सुनावणी पार पडली. कर्नल गीता शर्मा यांच्यावतीने ज्येष्ठ वकील मनेका गुरुस्वामी यांनी बाजू मांडली, तर एएसजी ऐश्वर्या भाटी यांनी केंद्र सराकरकडून युक्तिवाद केला.शॉर्ट सर्व्हिस कमिशन तत्वावर रुजू केलेल्या महिला लष्करी अधिकाऱ्यांना पदमुक्त केलं जाऊ नये, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. मात्र, केंद्र सरकारकडून ऐश्वर्या भाटी यांनी या महिला लष्करी अधिकाऱ्यांना पदमुक्त करण्याच्या बाजूने युक्तिवाद केला. त्यावरून सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला सुनावलं आहे.

# सीमेवर तणाव, पण शेअर बाजार स्थिर!

## सेन्सेक्स 547 अंकांनी घसरून 79,787.76 अंकांवर स्थिरावला

**।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**गेल्या काही वर्षांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर किंवा अगदी देशांतर्गत पातळीवरदेखील एखादी सामाजिक वा राजकीय बाबींवर परिणाम करणारी घटना घडताच त्याचे पडसाद मुंबई शेअर बाजारावर दिसून येतात. SENSEX किंवा NIFTY50 वधारले तर त्याचा गुंतवणूकदारांना आनंदच होतो. पण घटना नकारात्मक असेल, तर त्याचे शेअर बाजारावरील परिणामही बहुधा नकारात्मकच असतात.**



यंदा मात्र चित्र काहीसं वेगळं आहे. भारत-पाकिस्तान सीमेवर गेल्या १५ दिवसांपासून सातत्याने गोळीबार, ड्रोन हल्ले आणि तणाव असूनही शेअर मार्केट मात्र बऱ्याच अंशी स्थिर असल्याचं दिसत आहे. यामागे नेमकं काय कारण आहे?इंडियन एक्स्प्रेसनं सीमेवरील तणावाच्या पार्श्वभूमीवर मुंबई शेअर बाजारात दिसणारे कल आणि त्यामागची कारणं यासंदर्भात सविस्तर वृत्त दिलं आहे. बुधवारी पहाटे भारतीय हवाई दलाने पाकव्याप्त काश्मीर व पाकिस्तानच्या हद्दीतील दहशतवादी तळांवर एअर स्ट्राईक केल्यानंतर पाकिस्तानकडूनही सीमेवर सातत्याने आगळीक करण्यात येत आहे. परिणामी जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थान आणि गुजरात या राज्यांच्या सीमेकडील भागात मोठ्या प्रमाणावर तणाव निर्माण झाला आहे. भारतीय लष्कराकडूनही पाकिस्तानी लष्कराच्या कारवायांना सडेतोड उत्तर दिलं जात आहे.दरम्यान, सीमेवरील तणावानंतरदेखील शेअर बाजारात मोठी पडझड न होण्यासाठी वेगवेगळ्या गोष्टी कारणीभूत ठरल्याचं इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तात नमूद केलं आहे. यामागचं सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे सीमेवरील तणावामध्ये भारत पाकिस्तानच्या वरचढ ठरला आहे. त्यामुळे संपूर्ण देशाप्रमाणेच शेअर बाजारातही सकारात्मक वातावरण कायम आहे.आज सकाळी शेअर बाजार उघडला तेव्हा सेन्सेक्स ५४७ अंकांनी घसरून ७९,७८७.७६ अंकांवर स्थिरावला.

### शेअर बाजारात हे असं का घडतंय?

सामान्य परिस्थितीत असं काही घडलं असतं तर शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळाली असती. पण यावेळी ते न घडण्यामागे दोन कारणं आहेत. पहिलं तर आत्तापर्यंत जो काही तणाव सीमेवर निर्माण झाला आहे, त्यात भारताचाच वरचष्मा पाहायला मिळत आहे. दुसरं कारण म्हणजे जागतिक स्तरावर आर्थिक क्षेत्रात निर्माण झालेल्या परिस्थितीचा शेअर बाजारावर थेट परिणाम पाहायला मिळत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे डॉलर काही प्रमाणात कमकुवत झाला असून अमेरिकन व चीनी अर्थव्यवस्थांना याचा काही अंशी फटका बसला आहे. त्यामुळे परिणामी भारतीय शेअर बाजाराला याचा फायदा झाल्याचं अर्थविषयक तज्ज्ञांचं म्हणणं आहे.

# १५ वर्षांचा संसार मोडला

‘पोन्नियिन सेल्वन’ फेम अभिनेता रवी मोहन त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. सहा महिन्यांपूर्वी घटस्फोटाची घोषणा करणाऱ्या रवी मोहनने त्याच्या कथित गर्लफ्रेंडबरोबर एका लग्नाला हजेरी लावली. रवीने शुक्रवारी चेन्नई येथे निर्माते इशारी गणेश यांच्या मुलीच्या लग्नाला हजेरी लावली. त्याच्याबरोबर त्याची कथित प्रेयसी, गायिका केनिशा फ्रान्सिस देखील होती. या दोघांनी सोनेरी रंगाच्या कपड्यांमध्ये ट्विनिंग केलं होतं. दोघांचा व्हिडीओ सध्या चांगलाच व्हायरल



होत आहे. रवी (RAVI MOHAN VIRAL VIDEO) व केनिशाचे अनेक फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. एका क्लिपमध्ये, दोघे लग्नात एकत्र बसलेले दिसत आहेत, पाहुणे येत आहेत आणि त्यांचे स्वागत करत आहेत. रवीने धोतीसह पारंपरिक शर्ट घातला होता, तर केनिशाने भरतकाम केलेली एक सुंदर सोनेरी रंगाची साडी नेसली होती.रवी मोहन व केनिशा फ्रान्सिस यांनी अद्याप त्यांच्या नात्याची सार्वजनिकरित्या कबुली दिलेली नाही. पण आता ट्विनिंग करत लग्नाला हजेरी लावल्याचा हा व्हिडीओ पाहिल्यानंतर लोकांचे अंदाज खरे होते, असं नेटकरी म्हणत आहेत. “अरे देवा, त्या अफवा खऱ्या होत्या का?? रवी केनिशा फ्रान्सिससोबत,” अशी कमेंट एका युजरने केली आहे. तर लोकांचा या दोघांबद्दलचा अंदाज खरा ठरला, असं एका युजरने म्हटलंय.

# साराला चित्रपटांसाठी झालेली विचारणा

भारतीय क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरची लेक सारा तेंडुलकर ही कुणी बॉलिवूड सेलिब्रिटी नाही. पण ती एखाद्या सेलिब्रिटीपेक्षा कमीही नाही. सोशल मीडियासह सर्वच माध्यमांमध्ये तिच्या नावाच्या अनेक चर्चा होताना दिसतात. सोशल मीडियावर तिचा चांगलाच चाहतावर्ग आहे. सारा तिचे अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करत चाहत्यांच्या संपर्कात राहत असते. अशातच ती बॉलीवूडमध्ये एन्ट्री करणार असल्याच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून होत आहेत. सारा तेंडुलकर अभिनय क्षेत्रात प्रवेश करेल का, असा प्रश्न अनेकदा तिला विचारण्यात आला आहे. अखेर साराने या प्रश्नाचे उत्तर दिले आहे. तसंच तिला एका गोष्टीची भीती वाटत असल्याचंही तिने सांगितलं आहे. साराने नुकतंच ‘व्होग इंडिया’ला मुलाखत दिली. यावेळी तिनं अभिनय क्षेत्रात जाण्याची इच्छा नसल्याचं सांगितलं. तसंच अभिनय हे तिच्या स्वभावाशी सुसंगत नाही, असं साराला वाटतं. याबद्दल सारा म्हणाली, “मला कॅमेऱ्याची भीती वाटते. अभिनय समाधानापेक्षा अधिक मला मानसिक दबाव देतो. म्हणून मी अनेक ऑफर्स नाकारल्या आहेत. मी फक्त त्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करते, ज्या मला योग्य वाटतात. मी प्रत्येक गोष्टीला हो म्हणत नाही. मला अभिनयात रस नाही.” पुढे साराने हेही कबूल केलं की, तिचा स्वभाव हा अंतर्मुख आहे. प्रसिद्धीपासून दूर राहणं आणि स्वतःचं आयुष्य शांतपणे जगणं हे तिला अधिक जवळचं वाटतं.सारा तेंडुलकर वडील सचिन तेंडुलकर यांच्याप्रमाणे क्रिकेट क्षेत्रात आली नाही. खेळ हा तिचा आवडीचा विषय कधीच नव्हता. त्याऐवजी तिने आईच्या क्षेत्रात जाण्याचा निर्णय घेतला. सचिनची पत्नी अंजली ही बालरोगतज्ज्ञ आहे. त्यामुळे आईच्या



पावलावर पाऊल ठेवत साराने बायोमेडिकल सायन्समध्ये पदवी घेतली. मग पुढे युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनमधून क्लिनिकल न्यूट्रिशन आणि पब्लिक हेल्थमध्ये पदव्युत्तरचे शिक्षण घेतलं आहे.सारा ही केवळ क्रिकेटपटूची मुलगी म्हणून नव्हे, तर स्वतःच्या गुणांमुळेही चर्चेत राहिली आहे. ती सोशल मीडियावर चांगलीच सक्रिय असून, तिच्या फोटोंमुळे ती आजच्या युवापिढीमध्ये विशेष लोकप्रिय आहे. तिच्यात नम्रता आणि सौजन्य हे गुण आहेत. तिचा अभ्यासात रस असल्याचं तिच्या शैक्षणिक कारकिर्दीतून दिसून येतं.सारा तेंडुलकर अनेकदा ब्रँड प्रमोशन आणि मॉडेलिंग करताना दिसते. यामुळे तिचे अनेक चाहते तिला भविष्यात चित्रपटांमध्ये दिसण्याबद्दल विचारणा करत होते. मात्र आता यावर साराने थेट ‘मला कॅमेऱ्याची भीती वाटते’ असं म्हटलं आहे. तसंच तिने आलेल्या चित्रपटांच्या ऑफर्सही नाकारल्याचं सांगितलं आहे. त्यामुळे तिच्या अनेक चाहत्यांचा हिरमोड झाला आहे.भारतीय क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरची लेक सारा तेंडुलकर ही कुणी बॉलिवूड सेलिब्रिटी नाही. पण ती एखाद्या सेलिब्रिटीपेक्षा कमीही नाही. सोशल मीडियासह सर्वच माध्यमांमध्ये तिच्या नावाच्या अनेक चर्चा होताना दिसतात. सोशल मीडियावर तिचा चांगलाच चाहतावर्ग आहे. सारा तिचे अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करत चाहत्यांच्या संपर्कात राहत असते. अशातच ती बॉलीवूडमध्ये एन्ट्री करणार असल्याच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून होत आहेत. सारा तेंडुलकर अभिनय क्षेत्रात प्रवेश करेल का, असा प्रश्न अनेकदा तिला विचारण्यात आला आहे. अखेर साराने या प्रश्नाचे उत्तर दिले आहे.

# प्रेक्षकांच्या आग्रहाखातर मालिका सुरु राहणार का?

अभिनेता राकेश बापट व अभिनेत्री वल्लरी विराज हे कलाकार ‘नवरी मिळे हिटलरला’ या मालिकेतून घराघरांत पोहोचले आहेत. या मालिकेतील एजे व लीला ही पात्रे लोकप्रिय ठरली आहेत. आता काही दिवसांपासून ‘नवरी मिळे हिटलरला’ ही मालिका एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. ही मालिका लवकरच प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. त्यामुळे मालिकेचे चाहते भावूक झाल्याचे पाहायला मिळत आहे. आता राकेश बापट व वल्लरी विराज यांनी एका मुलाखतीत याबाबत वक्तव्य केले आहे.राकेश बापट व वल्लरी विराज यांनी नुकतीच ‘लोकमत फिल्मी’ला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी मालिका संपण्याबाबत, तसेच प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या प्रेमाबाबत, याबरोबरच मालिका बंद करण्याचा निर्णय चॅनेल बदलणार का, अशा अनेक प्रश्नांवर त्यांनी त्यांचे मत मांडले आहे.मालिकेला व भूमिकेला मिळणाऱ्या प्रेमाबद्दल राकेश बापट म्हणाला, “लोकांचं प्रेम बघून मन भारावून जातं. इतकं प्रेम अपेक्षित नव्हतं. आता लोक मालिकेचा हॅशटॅग करीत आहेत. ते ट्रेंडिंगला होतं. ते ऐकून बरं वाटतं. कारण- एवढं प्रेम नशिबात होतं आणि आहे. त्यांच्या प्रेमाबद्दल बोलण्यासाठी शब्द सापडत नाहीत.”एजे व लीलाच्या केमिस्ट्रीबद्दल बोलताना वल्लरी म्हणाली, “आम्ही सीन करताना खूप मजा करतो. ती मजा करता-करता आम्ही शूटिंग करतो. त्यामुळे ते सीन छान शूट होतात. विशेषत: आमचे जे दिग्दर्शक आहेत, जे खूप मेहनत घेतात. प्रत्येक रोमँटिक सीन कसा वेगळा करता येईल, याची ते काळजी घेतात. आमची मालिका लोकांना आवडते, यामागे सगळ्यांचे प्रयत्न आहेत. आमची संपूर्ण टीम मेहनत घेते.”मालिका बंद करण्याचा निर्णय बदलणार का? यावर राकेश म्हणाला, “काही सांगता येत नाही. कारण- तो चॅनेलचा निर्णय असतो. कधी कधी ठरवलेलं असतं की, एक वर्षापर्यंत ही गोष्ट चालणार आहे. तसं बहुतेक होतं आणि त्याप्रमाणेच निर्णय घेतले आहेत. पण, मालिका चालू असेल किंवा बंद झाली तरी प्रेक्षकांचं जे प्रेम मिळालं आहे, तेच आम्ही घेऊन चाललो आहोत. आमच्याठी तेच पुरेसं आहे. आम्ही खूप मजा केली. एजे-लीलाच्या जोडीचं इतकं कौतुक झालं. पुरस्कार सोहळ्यात आम्ही सगळे पुरस्कार घेऊन आलो. तर त्यामुळे इतक्या कमी कालावधीत इतकं प्रेम मिळालं आहे. एवढं प्रेम मिळणं नशीब असतं. आम्ही आभारच मानू शकतो. आता पुढे मालिकेचं काय होणार, हे या क्षणी तरी सांगू शकत नाही.”

# यशस्वी जैस्वालचा यू- टर्न!

## आयपीएल सुरू असताना मुंबईकडून खेळण्याची विनंती

**। नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारतीय संघातील युवा सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वालने गेल्या एक वर्षात कसोटी क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे. कमी कालावधीत त्याने आपला चांगलाच ठसा उमटवला आहे. जे भल्याभल्या फलंदाजांना नाही जमलं, ते यशस्वीने एका वर्षात करून दाखवलं आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये तो मुंबईकडून खेळायचा. मात्र, काही दिवसांपूर्वी त्याने मुंबईची साथ सोडून गोवा संघाकडून खेळण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, आता त्याने यू टर्न घेतला असून पुन्हा एकदा मुंबईकडून खेळण्याचा निर्णय घेतला आहे.**

काही दिवसांपूर्वी यशस्वी जैस्वालने मुंबई क्रिकेट असोसिएशनला गोवाकडून खेळण्यासाठी एनओसीची मागणी केली होती. मात्र आता यशस्वीने आपला निर्णय बदलला आहे. आता त्याने मुंबई क्रिकेट असोसिएशनला ई-मेल केला असून एनओसी मागे घेण्याची विनंती केली आहे. माध्यमातील वृत्तानुसार, यशस्वी जैस्वालला गोवा संघाचं नेतृत्व करण्याची संधी मिळणार होती. यासह त्याने वैयक्तिक कारणामुळे गोवा संघाकडून खेळण्याचा निर्णय घेतला असल्याचंही म्हटलं जात होतं. मात्र आता त्याने मुंबई क्रिकेट असोसिएशनला विनंती करणारा ई-मेल केला आहे. त्याने पुन्हा एकदा मुंबई संघाकडून खेळू देण्याची विनंती केली आहे. मी अजून बीसीसीआय आणि गोवा क्रिकेट असोसिएशनला एनओसी दिली नसल्याचंही या ई-मेलमध्ये म्हटलं गेलं आहे.यशस्वी जैस्वालने देशांर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे. त्याची देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरी पाहिली, तर त्याने ३२ सामने खेळले आहेत. यादरम्यान त्याने ६६ डावांत फलंदाजी करताना ३७१२ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने १२ शतकं आणि १२ अर्धशतकं झळकावली आहेत. यादरम्यान २०३ धावा



ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे.तर लिस्ट ए क्रिकेटमधील कामगिरीबद्दल बोलायचं झालं, तर त्याने आतापर्यंत ११६ सामने खेळले आहेत. यादरम्यान त्याने ३२.८६ च्या सरासरीने ३४५१ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ३ शतकं आणि २२ अर्धशतकं झळकावली आहेत. देशांतर्गत क्रिकेटमध्ये यशस्वी जयस्वालच्या फलंदाजीचा दबदबा पाहायला मिळाला आहे.यशस्वी जैस्वालने आयपीएल २०२५ स्पर्धेतही आपली छाप सोडली आहे. त्याची या हंगामातील कामगिरी पाहिली, तर त्याने सलामीला फलंदाजी करताना १२ सामन्यांमध्ये ४७३ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ५ अर्धशतकं झळकावली आहेत. मात्र, राजस्थान रॉयल्सचा संघ या स्पर्धेत आपली छाप सोडू शकलेला नाही. संजू सॅमसनसची दुखापत राजस्थानला चांगलीच महागात पडली. राजस्थानचा संघ या स्पर्धेतून बाहेर पडला आहे.काही दिवसांपूर्वी यशस्वी जैस्वालने मुंबई क्रिकेट असोसिएशनला गोवाकडून खेळण्यासाठी एनओसीची मागणी केली होती. मात्र आता यशस्वीने आपला निर्णय बदलला आहे. आता त्याने मुंबई क्रिकेट असोसिएशनला ई-मेल केला असून एनओसी मागे घेण्याची विनंती केली आहे. माध्यमातील वृत्तानुसार, यशस्वी जैस्वालला गोवा संघाचं नेतृत्व करण्याची संधी मिळणार होती. यासह त्याने वैयक्तिक कारणामुळे गोवा संघाकडून खेळण्याचा निर्णय घेतला असल्याचंही म्हटलं जात होतं. मात्र आता त्याने मुंबई क्रिकेट असोसिएशनला विनंती करणारा ई-मेल केला आहे. त्याने पुन्हा एकदा मुंबई संघाकडून खेळू देण्याची विनंती केली आहे. मी अजून बीसीसीआय आणि गोवा क्रिकेट असोसिएशनला एनओसी दिली नसल्याचंही या ई-मेलमध्ये म्हटलं गेलं आहे.यशस्वी जैस्वालने देशांर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे. त्याची देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरी पाहिली, तर त्याने ३२ सामने खेळले आहेत. यादरम्यान त्याने ६६ डावांत फलंदाजी करताना ३७१२ धावा केल्या आहेत.

### यशस्वी जैस्वालने आपली छाप सोडली

यादरम्यान २०३ धावा ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे.तर लिस्ट ए क्रिकेटमधील कामगिरीबद्दल बोलायचं झालं, तर त्याने आतापर्यंत ११६ सामने खेळले आहेत. यादरम्यान त्याने ३२.८६ च्या सरासरीने ३४५१ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ३ शतकं आणि २२ अर्धशतकं झळकावली आहेत. देशांतर्गत क्रिकेटमध्ये यशस्वी जयस्वालच्या फलंदाजीचा दबदबा पाहायला मिळाला आहे.यशस्वी जैस्वालने आयपीएल २०२५ स्पर्धेतही आपली छाप सोडली आहे. त्याची या हंगामातील कामगिरी पाहिली, तर त्याने सलामीला फलंदाजी करताना १२ सामन्यांमध्ये ४७३ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ५ अर्धशतकं झळकावली आहेत. मात्र, राजस्थान रॉयल्सचा संघ या स्पर्धेत आपली छाप सोडू शकलेला नाही. संजू सॅमसनसची दुखापत राजस्थानला चांगलीच महागात पडली. राजस्थानचा संघ या स्पर्धेतून बाहेर पडला आहे.भारतीय संघातील युवा सलामीवीर फलंदाज यशस्वी जैस्वालने गेल्या एक वर्षात कसोटी क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी केली आहे.

---

# आम्ही सदैव तुमचे ऋणी राहू!

## भारतीय सैनिकांसाठी विराट-अनुष्काची भावूक करणारी पोस्ट

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये तवाणाची स्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानातील दहशतवाद्यांनी पहलगामवर हल्ला करून निष्पाप भारतीयांचा जीव घेतला होता. त्यामुळे आता भारताने देखील ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानला चांगलच प्रत्युत्तर दिलं आहे. भारतीय सैन्य युद्धभूमीवर पाकिस्तानचे डाव हाणून पाडत आहे.**

दरम्यान भारताचा स्टार क्रिकेटपटू विराट कोहलीने भारतीय सैन्याचं कौतुक करणारी पोस्ट शेअर केली आहे.गुरूवारी पाकिस्तानी सैन्याने भारतातील काही राज्यांवर ड्रोन





हल्ले केले. मात्र, भारतीय सैन्याने पाकिस्तानचे सर्व ड्रोन खाली पाडले. आता विराट कोहलीने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्याने लिहिले की, ” या कठीण काळात जे जिद्दीने देशाचे संरक्षण करत आहेत, अशा सशस्त्र दलांना आम्ही सलाम करतो आणि त्यांच्याबरोबर आम्ही एकजूटीने उभे आहोत. त्यांच्या अटल शौर्यासाठी आम्ही नेहमीच त्यांचे ऋणी राहू. त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी आपल्या महान देशासाठी दिलेल्या बलिदानाबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो.” या पोस्टवर त्याने जय हिंद असं लिहिलं आहे.यासह विराट कोहलीची पत्नी अनुष्का शर्मने देखील पोस्ट शेअर करून भारतीय सैन्याचे आभार मानले आहेत. अनुष्काने पोस्ट शेअर करत लिहिले, “आम्ही भारतीय सशस्त्र दलाचे आभारी आहोत. या कठीण काळात त्यांनी आमचं नायकासारखं संरक्षण केलं आहे. त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या बलिदानाबद्दल आम्ही आभारी आहोत.”ऑपरेशन सिंदूरचा परिणाम आयपीएल २०२५ स्पर्धेवर देखील झाल्याचे पाहायला मिळाले आहे.गुरूवारी या स्पर्धेतील सामना पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये होणार होता. या सामन्याला सुरूवात झाली. पहिल्या डावातील १० षटकं झाल्यानंतर सुरक्षेच्या कारणास्तव स्टेडियमचे फ्लड लाईट्स बंद करण्यात आले.त्यानंतर प्रेक्षकांना मैदानाबाहेर जाण्यासाठी सांगण्यात आलं. मात्र आता ही स्पर्धा एका आठवड्यानंतर पुन्हा सुरू होणार असल्याची घोषणा बीसीसीआयकडून करण्यात आली आहे. त्यामुळे या स्पर्धेला आठवड्याभरानंतर पुन्हा एकदा सुरूवात होणार आहे.

### कोहलीची या हंगामातील कामगिरी

या हंगामात विराट कोहलीची बॅट आग ओकतेय. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघही सध्या दमदार फॉर्ममध्ये आहे. विराटच्या या हंगामातील कामगिरीबद्दल बोलायचं झालं, तर त्याने आतापर्यंत झालेल्या ११ सामन्यांमध्ये ६३.१२ च्या सरासरीने ५०५ धावा केल्या आहेत. यासह तो ऑरेंज कॅपच्या शर्यतीत देखील आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शनिवार ।
। दि. 10 मे 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## शिक्षण विश्व : राष्ट्रीय सुरक्षेचा अविभाज्य भाग

# सायबर सुरक्षेमधून प्रगती शक्य - डॉ. शेंग लुंग पेंग

### आकुर्डीतील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय शोध निबंध परिषद



**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**सायबर सुरक्षा सुनिश्चित केल्याशिवाय देशाची प्रगती शक्य नाही. इंटरनेट डेटाच्या वाढत्या वापराच्या पार्श्वभूमीवर ‘ ‘सायबर सिक्युरिटी’ राष्ट्रीय सुरक्षेचा अविभाज्य भाग बनली आहे. ते रोखण्याकरता सायबर सिक्युरिटी ही सक्षम असलीच पाहिजे. पुणे शहर हे टेक्नॉलॉजीचे केंद्र आहे व पुण्यामध्ये संगणकीय ज्ञान प्रगत असून सायबर सिक्युरिटी च्या नवनवीन कल्पना येथे उगम पावतात, असे प्रतिपादन नॅशनल तैपेई युनिव्हर्सिटी ऑफ बिझनेस (क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी आणि डिझाइन विभाग) तैवानचे डायरेक्टर डॉ. शेंग लुंग पेंग यांनी केले.**

डी. वाय.पाटील शैक्षणिक संकुलनातील डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय शोधनिबंध परिषदेच्या उदघाटनप्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

या परिषदेसाठी विशेष निमंत्रित कम्प्युटर शास्त्रज्ञ आणि प्राध्यापक, टेक्नो इंटरनॅशनल न्यू टाऊन कोलकाताचे डॉ. नीलजन डे, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या असिस्टंट कन्सल्टंट श्रीमती स्मिता जाधव, पिंपरीच्या सायबर क्राईम डिपार्टमेंटचे पोलीस उपनिरीक्षक सागर पोमन सर, डॉ. डी वाय पाटील शैक्षणिक संकुलाचे संचालक रियर ऍडमिरल अमित विक्रम(निवृत्त), शैक्षणिक संकुलाचे मुख्य वित्तीय अधिकारी बी. एच. शर्मा, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पी. मालती, प्रशासकीय अधिष्ठाता डॉ संदीप सरनोबत, परिषदेचे समन्वयक माहिती तंत्रज्ञान अभियांत्रिकी विभागाच्या विभाग प्रमुख डॉ लतिका देसाई , स्थापत्य अभियांत्रिकी चे विभाग प्रमुख डॉ. अशोक मोरे, तसेच परिषदेचे सहसमन्वयक डॉ. कल्याण बामणे, व डॉ. तपोब्रता डे आदी उपस्थित होते.

डॉ. नीलांजन डे यावेळी म्हणाले आजच्या युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंगचा वापर खूप होत आहे. याचा उपयोग करून मोठमोठे स्टार्टअप सुरू होत आहेत, यातूनच देशाची प्रगती साधता येईल.

पिंपरीच्या सायबर क्राईम डिपार्टमेंटचे पोलीस उपनिरीक्षक सागर पोमन यांनी सायबर क्राईम दिवसेंदिवस वाढत चालले आहे आणि ते रोखण्यासाठी लोकांमध्ये जागृती असणे आवश्यक आहे म्हणून सायबर सिक्युरिटी चा उपयोग अत्यंत महत्त्वाचा आहे , असे नमूद केले.

टाटा टेक्नॉलॉजी सर्व्हिसेसच्या असिस्टंट कन्सल्टंट श्रीमती स्मिता जाधव म्हणाल्या, संशोधकांनी नवनवीन तंत्रज्ञान व पद्धती अमलात आणून संशोधन घडवून आणण्याची आवश्यकता आहे. कॉर्पोरेट क्षेत्रामध्ये सायबर सिक्युरिटी चे महत्व खूप वाढले असून प्रत्येक पंधरा दिवसाला या संदर्भातील प्रशिक्षण कंपनी कर्मचाऱ्यांना देत असते.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ पी मालती यांनी उपस्थितांचे स्वागत करून महाविद्यालयाची माहिती दिली आणि सर्व मान्यवरांच्या उपस्थिती मुळे कॉन्फरेन्स मध्ये तंत्रज्ञान क्षेत्रातील नवनवीन कल्पना, संशोधन आणि ज्ञानाची देवाण-घेवाण होईल असे प्रतिपादन केले.

यावेळी परिषदेच्या समन्वयक डॉ. लतिका देसाई व डॉ. अशोक मोरे यांनी परिषदेची विस्तृत माहिती देऊन उपस्थित यांचे स्वागत केले.तब्बल 176 शोधनिबंध या कॉन्फरन्स साठी प्राप्त झाले असून त्यातील 145 पेपर ची निवड केली आहे. एकूण 7 सत्रांमध्ये हे पेपर सादर केले जाणार आहेत. भारताच्या विविध राज्यातून विद्यार्थी, प्राध्यापक आणि संशोधक, तसेच भारताबाहेरील विविध रिसर्च स्कॉलर्स आपले संशोधन या कॉन्फरन्स मध्ये सादर होतं आहेत. ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आराधना चव्हाण, डॉ. सुहास पाटील यांनी केले. ह्या कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली, त्यासाठी परिषदेचे सहसमन्वयक डॉ. बामणे आणि डॉ. तपोब्रता डे यांनी आभार प्रदर्शन केले. सदर परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी, डी वाय पाटील आकुर्डी संकुलाचे चेअरमन सतेज पाटील, डॉ. डी वाय पाटील प्रतिष्ठानचे विश्वस्त तेजस पाटील, प्रशासकीय अधिष्ठाता डॉ. संदीप सरनोबत यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### विद्यार्थी दशेतच संशोधनाची बीजे रोवली पाहिजे-अमित विक्रम

डॉ. डी. वाय. पाटील शैक्षणिक संकुलनाचे संचालक रियर ऍडमिरल अमित विक्रम (निवृत्त) यांनी आजच्या बदलत्या परिस्थितीत मानवाच्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज आहे व त्यासाठी तंत्रज्ञान संशोधनाची स्पर्धा व मागणी वाढत चालली आहे. याकरिता विद्यार्थी दशेतच


ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
“यत् भावो – तत् भवति”
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> ‘C’ Language
> Basic Java
> Basic Tally
From
5th May 2025
1 Hour / day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292

# पीएचडी मार्गदर्शकांकडून होताहेत गैरव्यवहार!

## आमदार शंकर जगताप: विधानसभेत राज्य सरकारचे लक्ष वेधले!

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.**



आमदार शंकर जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेसह, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील नियंत्रण, विद्यार्थ्यांची गैरसोय, आणि पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर सरकारने कोणती पावले उचलली आहेत, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेची घटना खरी असल्याचे मान्य केले. मात्र, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांची छळवणूक होते, हा आरोप फेटाळला. तसेच, संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी नाकारला. पुढील उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर 'पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली' कार्यान्वित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठाकडून सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवणे हे संशोधन केंद्रांना बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात विद्यापीठाने आवश्यक ती माहिती संकलित केली असून, शासनस्तरावरही कार्यवाही करण्यात येत असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहात सांगितले. या चर्चेदरम्यान, पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील देखरेख अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले.

